सामनेवालेतर्फे श्री.ए.आर.जोशी, वकील यांचेकडून पुढील उलटतपास चालू

हे खरे आहे की QAD कडून सॅम्पल रिपोर्टस मिळतो. तसेच सदरच्या रिपोर्ट मध्ये ऑपरेशन्स सुरू करण्यासाठी सूचना असते व नंतर प्रॉडक्शन चालू होते. हे म्हणणे खरे आहे की प्रत्येक शिफ्टला टारगेट ठरलेले असायचे. हे म्हणणे चुकीचे आहे की सदरचे झालेला प्रॉडक्शनचे रेकॉर्ड करावे लागत. हे म्हणणे चुकीचे आहे की ऑपरेशन मध्ये डाउन टाईम आल्यास तोही रेकॉर्ड करावा लागत असे. हे खरे आहे की प्रॉडक्शन मध्ये डाउन टाईम आल्यावर त्याची कारण वरिष्ठांना कळवावी लागत. हे म्हणणे चुकीचे आहे की मशीनवर काम करणारे कामगार त्यांची सुरक्षा व प्रॉडक्ट बघण्याचे काम माझेकडे होते. (साक्षीदार स्वत: सांगतो की ते काम सुपरवायझर यांच्याकडे होते). हे म्हणणे चुकीचे आहे की मी सुपरवायझर असल्याने मीच काम पाहत होतो. हे म्हणणे चुकीचे आहे की भारतीय मजदूर संघटनेचे जे ऑपरेटर्स होते त्याचे सेफटी पाहण्याचे काम सुध्दा माझे होते. हे म्हणणे खरे आहे की एकदा बेल्ट अनलोड झाल्यावर टूग/लेवल लावायचे काम माझे होते. हे म्हणणे खरे आहे की cured बेल्टचे incpection ची जबाबदारी माझी होती. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रॉडक्शनला लागणा–या मालाची यादी मला ध्यावी लागत होती. हे म्हणणे चुकीचे आहे की प्रॉडक्शनची चेक लिस्ट पाहून मी तयार करत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की daily performance रिपोर्ट मला बोर्डावर लिहावा लागत असे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी प्रॉडक्शन लाईनवर प्रॉडक्शनकरिता काम केले नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी ऑपरेटर नसल्यामुळे कधी प्रॉडक्शन लाईनवर काम केले नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की मी सुपरवायझरचे काम करीत होतो.

मला दरमाह रू.१४०००/– पगार होता. हे खरे नाही की मला जुनियर सुपरवायझर म्हणून नेमणूक करून माझेकडून प्रॉडक्शन लाईनचे घेतले जाते हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम–२ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मला काम करण्याकरिता सुपरवायझर सूचन देत होते हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी स्वत: मशीनवर काम करतो व सोबत दोन ऑपरेटर काम

औद्योगिक न्यायालय

करतात हे माझे कथन चुकीचे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम—३ मधील मजकूर खोटा आहे. माझे प्रतिज्ञापत्रात कथन केलेले कलम—३ मी स्वत: हाताने काम करतो हे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की माझे प्रतिज्ञापत्रातील कलम—४ ते १३ मधील मजकूर खोटा आहे. हे चुकीचे आहे की माझे कामाचे स्वरूप कलम—४ मधील वर्णन केल्यानुसार मी कामगार संज्ञात येतो हे कथन खोटे आहे. हे म्हणणे चुकीचे आहे की मी माझे प्रतिज्ञापत्रात वारंवार ऑपरेटरचे काम केल्याचे कथने, ते माझे म्हणणे खोटे आहे.

हे म्हणणे चुकीचे आहे मी खोटी प्रतिज्ञापत्र सादर करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

(एम. आर. कुंभार)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, पुणे

पुणे
दिनांक:०३/०९/२०१८

औद्योगिक न्यायालय